**धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,लातूर**
**दिवाणजी कॉम्प्लेक्स, दुसरा मजला,अंबाजोगाईरोड,लातूर-४१३५१२**

# सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत जाहिरात

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय,मुंबई ४०००३२ दि.१७.१२.२०१६ अनुसार दिलेल्या निर्देशानुसार लघुलेखक (क.श्रे.) या संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीवर धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,लातूर येथे विवक्षीत कामासाठी (श्रुतलेखन व टंकलेखन) नेमणुक करावयाची आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | लघुलेखक (क.श्रे) | ०१ | लघुलेखक (क.श्रे.) या पदावर तीन वर्षाचा अनुभव |

शासकीय कार्यालयात/न्यायालयात/धर्मादाय संघटनेत लघुलेखनाचे कामकाज केलेले सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणुक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. धर्मादाय संघटनेतील लघुलेखक (क.श्रे.) या संवर्गातील सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांना प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त अधिकारी यांना श्रुतलेखनाचे ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज धर्मादाय सह आयुक्त,लातूर विभाग,लातूर यांच्याकडे दि.१८.०२.२०२५रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत प्राप्त होईल याप्रमाणे टपालाद्वारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत.अर्जाचे पाकिटावर "सेवानिवृत्त अधिकारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत "असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे.तसेच अर्जासोबत आपले नाव व संपुर्ण पत्ता असलेले (१७x१० सें.मि.आकाराची) दोन (२) रिकामे पाकिटावर रुपये ४०/- इतके रक्कमेचे पोष्ट तिकीट चिकटवून अर्जासोबत सादर करावीत. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा व अपुर्ण असलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणुका सल्लागार समिती मार्फत पात्र उमेदवारांच्या मुलाखतीद्वारे करण्यात येतील.

सही/-
(राजेश अ. सासने)
धर्मादाय सह आयुक्त
लातूर विभाग,लातूर

**सदर नेमणुका हया खालील सर्वसाधारण अटी व शर्थीच्या अधिन राहतील.**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणुका या एक वर्षाच्या कालावधीसाठी आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१७.१२.२०१६ मधील अटी व शर्थीप्रमाणे ,तसेच सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.०८.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक त्यांना अनुज्ञेय राहिल.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने रुपये ५००/-च्या स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहिल.

५. करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात येणाऱ्या व्यक्ती त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच पदावर कार्यरत राहू शकतील.

६. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्ती यांनी त्यांची शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र अटी व शर्थी संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत हयाबाबतचे उमेदवाराने रुपये ५००/-च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्ती विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालु अथवा प्रलंबित नसावे. याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहिल.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेल्या सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहिल.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्ती यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या नियुक्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

१२. करार पध्दतीवरील व्यक्ती यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती,कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहिल.

१३. करार पध्दतीवरील नियुक्त व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहिल. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीस नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार जाहिरातीतील नमुद केलेली पदे कमी/अधिक होऊ शकतात.

सही/-
(राजेश अ. सासने)
धर्मादाय सह आयुक्त
लातूर विभाग,लातूर

## विहित नमुन्यातील अर्ज

## सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी सेवानिवृत्त लघुलेखक (क.श्रे.) यांची नेमणुक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज.

प्रति,

मा.धर्मादाय सह आयुक्त,
लातूर विभाग,लातूर
दिवाणजी कॉम्प्लेक्स,दुसरा मजला
अंबाजोगाईरोड, लातूर-४१३५१२

फोटो

**अर्ज केलेल्या पदाचे नाव -----------------------------------------**

१) अर्जदाराचे नाव - वय - वर्षे
२) कायमचा पत्ता -
३) दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) -
४) ई-मेल (अनिवार्य) -
५) सध्याचा पत्ता -
६) जन्मतारिख -
७) राष्ट्रीयत्व -
८) प्रवर्ग -
९) लिंग - पुरुष/महिला
१०) अवगत भाषा -
११) शैक्षणिक माहिती -
१२) अनुभव -

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१३.सेवानिवृत्तीचा दिनांक-
१४.सेवानिवृत्त ज्या कार्यालयातून झाले त्या कार्यालयाचे नाव व सेवानिवृत्तीचे पद-
१५ सद्यःस्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल-
१६.विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे काय?- (होय/नाही)
(वर नमुद तपशिलाबाबत आवश्यक ते पुरावे स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत जोडावे.)

अर्जदाराचे संपुर्ण नाव व सही

कृपया मागे पहा.

## प्रतिज्ञापत्र

मी,श्री/श्रीमती-------------------------------------------प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की,आपण प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्थींचे वाचन केले असून ते मला पूर्णपणे मान्य आहे.

ठिकाण-
दिनांक-

स्वाक्षरी